# इथं अवाक् अन् थक्क व्हायला या!

**शाहू स्मारक भवनात चित्ताकर्षक छायाचित्र प्रदर्शन** **किर्लोस्कर वसुंधरा महोत्सव, निसर्गाचा अवर्णनीय सोहळा अनुभवण्याची संधी**

प्रतिनिधी
कोल्हापूर

त्यांचेही एक भावविश्व आहे. त्यांनाही संवेदना आहेत. त्यांची देखील एक वेगळी सृष्टी आहे. त्यांच्याही काही गरजा आहेत. त्यांनाही वाटत असावं, आपली ही सुंदर जीवसृष्टी अबाधित रहावी. ती कलांतराने अधिकाधिक फुलावी, वाढावी. मात्र, दिवसेंदिवसस जैवविविधतेमध्ये होणारा मानवी हस्तक्षेप त्यांच्या अधिवासाला मारक व घातक ठरू पहात आहे. तरीही त्यांनी आपल्या नैसर्गिक अधिवासात मुक्तपणे विहार करायचं सोडलेलं नाही. पक्षांचं पखांतील बळ एकवटून आकाशाकडे झेप घ्यायचं लक्ष्य बदललेलं नाही. कितीही नैसर्गिक उलथापालथी होऊ देत त्यांनी त्याला सामोरे जात जगायचं त्यांनी सोडलेलं नाही. जैवविविधतेमध्ये रममाण झालेल्या या पशु-पक्षी आणि वन्यजीवांचे, त्यांच्या अधिवासातील जीवनचक्र टिपले आहे मनस्वी छायाचित्रकारांनी. तेही संवेदनशीलता जपत...! शाहू स्मारक भवनाच्या कला दालनातील हा निसर्गातील अवर्णनीय सोहळ्याची प्रत्यक्ष अनुभुती एकदा घ्यायलाच हवी.

पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी गुरूवारपासून शाहू स्मारक भवन येथे किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातंर्गत गुरूवारपासून निसर्गविषयक छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध छायाचित्रकारांनी निसर्गातील दुर्मीळ पशु-पक्षी, वन्यप्राणी, कीटक आदींची छायाचित्रे टिपली आहेत. बहुधा यापूर्वी कधीही कशी फोटोग्राफी अनुभवली नसेल अशा छायाचित्रांचा या प्रदर्शनात समावेश आहे. निसर्गाप्रती असणारे अतोनात प्रेम आणि सामाजिक भान राखून छायाचित्रकारांनी टिपलेली ही छायाचित्रे म्हणूनच अप्रतिम ठरली आहेत. या प्रदर्शनातून निसर्गाला जपा, प्राण्यांचे नैसर्गिक अधिवासावर अतिक्रमण करू नका, असा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या संदेश देण्यात आला आहे. अवकाशात मुक्त विहार करणारे पक्षी, त्यांचे रंगीबेरंगी छटा आणि त्यामुळे त्यांना प्राप्त झालेला नजाकतदारपणा, गोंडस, लोभस रूप प्रत्यक्षदर्शीचे रूप लगेचच वेधुन घेते. उभयचर प्राण्यांचा विणीचा हंगाम, त्यांची भक्ष्य (खाद्य) पकडण्यासाठी चाललेली धडपड, निसर्गाने केलेली उधळण अशी विविध छायाचित्रे भुरळ घालणारी ठरली आहेत. निसर्गाकडे चला, आमचेही भावविश्व जपा आणि आमच्या नैसर्गिक अधिवासाला धक्का न लावता निसर्ग भ्रमंतीचा आनंद लुटा, असाही एक संदेश हे छायाचित्र प्रदर्शन देते. निसर्ग, प्राणी-पक्षी यांच्याप्रती अर्थात, एकूणच जैवविवियतेसंदर्भात जाणिव जागृती करण्यासाठी हे प्रदर्शन नक्कीच उपयोगी ठरेल, यात शंका नाही.



कोल्हापूर : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातंर्गत शाहू स्मारक भवनात भरवण्यात आलेले छायाचित्र प्रदर्शन कुतुहलाने पाहताना महाविद्यालयीन युवती.

दै. तरुण भारत - २२/९/२०१४